classmate
Date ______
Page ______

# अधिक मासाचे वाण

मुलीचे लग्नानंतर ज्यावर्षी प्रथमच अधिक महिना येईल त्यावेळी जावयाला वाण देण्याची प्रथा आहे. या महिन्यात आपल्या सोयीप्रमाणे चांगला दिवस पाहून त्यादिवशी जावयाला बोलवावे. ताटामध्ये अगर केळीच्या पानावर 30+3 अनारसे मांडावे. मध्यभागी निरांजन लावावे व हे अनारसे वाण व दक्षिणा म्हणून चांदीचा रुपया असे सर्व जावयाला द्यावे. कोणी शक्य असेल तर चांदीचे ताट, निरांजन देतात. कोणी सोन्याचा अनारसा देतात. परंतु दीपदान व दक्षिणा जावयाला देणे हे महत्वाचे आहे. पहिल्या वर्षी अधिक महिन्यामध्ये शक्यतो अनारशाचे वाण द्यावे नंतर कोणतेही छिद्र असलेला पदार्थ वाण म्हणून द्यावा. उदा. बत्तासे, घीवर, म्हैसूर, कारण जेवढी वस्तूला अगणित छिद्रे असतील तेवढ्या अगणित वर्षाचे अधिक महिन्यातील वाणाचे पुण्य लाभते असे समजले जाते.

आईची ओटी मुलीने कधीही भरावयाची नसते, परंतु आषाढ किंवा चैत्र महिना अधिक आला तर, त्यावेळी आईची ओटी भरावी असा शास्त्रार्थ आहे. अधिक महिन्यात अशावेळी आई-वडिलांना जेवायला बोलवावे. त्यांना पाटावर बसवून त्यांचे गरम पाण्याने पाय धुवावे. हळद कुंकू घेऊन पायावर स्वस्तिक-कमळ काढावे. आईची खण-साडी असे देऊन ओटी भरावी. वडिलांना कपडे द्यावे, जणू काही आई-वडिलांना लक्ष्मी-विष्णूची जोडी असे समजून त्यांची पूजा करावी.

हे अधिक-मासाचे वाण आहे.

अनघा आपटे
सोना पार्क C173
mb. 9146398897